**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम '५२ अे' सह कलम १५८ (१) अन्वये केलेल्या नियमाचे अनुषंगाने कार्यवाहीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१४/प्र.क्र. ८२/१४/नवि-१३**
**दिनांक :- ०९ जुलै २०१८.**

राज्यातील नागरी भागातील दि.३१/१२/२०१५ पुर्वीच्या बेकायदेशिर बांधकामांना प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मध्ये सुधारणा करुन कलम-५२(अे) नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यासह उक्त अधिनियमाच्या कलम-१५८(१) मध्ये नमूद केलेली वैधानिक कार्यवाही पूर्ण करून तयार केलेले इंग्रजी नियम शासनाने दि.०७/१०/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर केलेले असून याबाबतचे प्रसिध्दीकरण दि.१०/१०/२०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात करण्यात आलेले आहे. सदर नियमाचे मराठी भाषेतील प्रसिद्धीकरण दि. २०/०२/२०१८ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात झालेले आहे. यानंतर उक्त अधिनियमातील कलम-१५८(३) च्या तरतूदीनुसार सदर नियम विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवणेसाठी सादर करण्यात आलेले आहेत.

या विषयाबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. ८०/२०१३ व १३८/२०१२ यामध्ये सुनावणी वेळी उपस्थित झालेल्या काही मुद्यांच्या अनुषंगाने स्पष्टीकरण/निदेश देणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे. सबब, राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

## निदेश

१) दि. ०७/१०/२०१७ रोजी मंजूर केलेल्या नियमातील तरतूदीनुसार दि. ३१/१२/२०१५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्यासाठी करावयाचे प्रसिद्धीकरण तसेच त्या अनुषंगीक कालमर्यादेसाठी शासनाने दि. १९/०६/२०१८ रोजी दिलेल्या स्पष्टीकरणानुसार नमूद केलेल्या कालमर्यादेत उचित कार्यवाही करावी.

२) दि. ०७/१०/२०१७ रोजी मंजूर केलेल्या नियमातील तक्त्यात अ.क्र. ८ येथे नमूद तरतूद खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| Stair case width / passage width / balcony / terrace / misuse of any free Floor Space Index component. | *These violations may be considered for declaration as compounded structure as per clause 3 mentioned in the table.* |

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या कलम-५२(अ) मधील तरतूदीनुसार दि.३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करणेसाठी संबंधित नियोजन प्राधिकरणाने यानुषंगाने शासनाने तयार केलेल्या दि.०७/१०/२०१७ रोजीच्या नियमानुसार कार्यवाही करणेसाठी शासनाची पुर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. तसा प्रस्ताव शासनास सादर करतेवेळी अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित केल्यामुळे त्याकरीता आवश्यक सामाजिक तसेच भौतिक सेवासुविधा कशा प्रकारे उपलब्ध होणार आहेत त्याबाबतचे नियोजनाचा तपशिल नमूद करणे आवश्यक आहे. या प्रस्तावास शासनाने मान्यता दिल्यानंतर नियोजन प्राधिकरणाने अशी बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

Scanned by CamScanner

४) दि.०७/१०/२०१७ रोजीच्या नियमातील तरतूद क्र. ६ नुसार मंजूर विकास योजनेतील आरक्षणे / झोनिंग बदलुन अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करावयाची झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ मधील फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन त्यास शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच याबाबतची पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अशी कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे संबंधित नियोजन प्राधिकरणाचे मत झाल्यास तसे प्रस्ताव या निदेशाच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत शासनास मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(रा.मे.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत माहितीसाठी:-
१)मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
२) मा.राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.inया वेबसाइट वर देखील प्रसिद्ध करण्यात यावेत. तसेच याच्या प्रती सर्व संबंधितांना पाठवून द्याव्यात.
५) मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
६) संचालक तथा सह सचिव (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सह संचालक तथा सह सचिव (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सह संचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष / मुल्यांकन / पुणे / कोकण / नाशिक /नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग
९) विभागीय आयुक्त, पुणे / कोकण / नाशिक /नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग.
१०) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
११) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
१२) सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
१३) शहर व औद्योगिक विकास महामंडळ, नवी मुंबई.
१४)सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, सर्व शाखा कार्यालये, नगर रचना विभाग.
१५) मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/नगर पंचायत.
१६) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.
१७) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.
१८) अवर सचिव, नवि-११ / नवि-१३ / नवि-३०.
१९) कक्ष अधिकारी, नवि-९ / नवि-१२.
२०) निवड नस्ती (नवि-१३).

Scanned by CamScanner